**<u>परीक्षेचे वेळापत्रक, ठिकाण, आकारण्यात येणारे शुल्कः-</u>**

मराठी टंकलेखन परीक्षा ही संगणकावर मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर व औरंगाबाद या पाच ठिकाणी वर्षातून दोन वेळा एप्रिल व ऑक्टोबर महिन्याच्या चौथ्या मंगळवारी आयोजित करण्यात येतात.

मराठी लघुलेखन परीक्षा मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या चार विभागीय ठिकाणी वर्षातून दोन वेळा एप्रिल व ऑक्टोबर महिन्याच्या चौथ्या शुक्रवारी आयोजित करण्यात येतात.

या परीक्षेला बसणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून मराठी टंकलेखन परीक्षेसाठी रूपये १००/- व मराठी लघुलेखन परीक्षेसाठी रु.५०/- इतके शुल्क आकारण्यात येते. सदर परीक्षा शुल्क हे ००७० इतर प्रशासकीय सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा इतर बाबी, ०१ इतर जमा रकमा, (०१) (०२) इतर बाबी, संगणक सांकेतांक क्र. ००७००६२६ या लेखाशीर्षाखाली चलनाने जमा करून त्याची प्रत आवेदनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

परीक्षेला बसणाऱ्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज कार्यालयप्रमुखामार्फत ६० दिवस अगोदर भाषा संचालनालयाच्या त्या त्या विभागीय कार्यालयाकडे पाठवणे आवश्यक आहे.

* * *